# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक ३३ / २०२४**

**वीज जोडणी दिनांक व इतर माहिती मिळण्याबाबत**

दिपा निवृत्ती ठोसर ........................................................................ अपिलार्थी

विरूध्द

अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड (ए.ई.एम.एल.) ........................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :-

निवृत्ती भाऊसाहेब ठोसर , प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :-

१. मुत्यृंजय झा. उपमहाव्यवस्थापक, नोडल अधिकारी
२. अशोक बागवे, विभागिय अधिकारी
३. सचिन विचारे, सिनिअर मॅनेजर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १ मार्च २०२४

आदेश पारित दिनांक :- २२ मार्च २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, अदानी इलेक्ट्रिसीटी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

मुंबई लिमिटेड (मंच) यांच्याकडील तक्रार (क्रमांक सीजीआरएफ९०१२/२०२३-२४) दिनांक १५ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आली. सदर आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी दाखल केले.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १ मार्च २०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी दिपा निवृत्ती ठोसर हे खोली क्र.९४, त्रिमुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था, दत्तात्रय चाळ न. २, इंदिरानगर न.१, दत्त मंदिराजवळ, साईनाथ नगर रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ येथील २०२३ पासून घरगुती वीज ग्राहक (क्र.१५३५१९८७६)आहेत.

- दिनांक २५ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहीता आणि वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनिमय २०२१ मधील विनियम १६.२.४.(अ) च्या तरतुदीनसार देण्यात येणाऱ्या वीज देयकावर अपिलार्थीच्या मुळ खोली मालकाला वीज जोडणी दिल्याची तारीख नमुद करून देण्यात यावी म्हणून अपिलार्थीनी अर्ज दाखल केला.

- अपिलार्थीनी नमुद केले की, सदर मालमत्ता सन १९९८ रोजी लालराम राळभर यांनी संतोष शेपळा यांना विकलो. त्यानंतर ती २००७ रोजी संतोष शेपळा यांनी निलेश वाघुले यांना विकली. सन २०१६ मध्ये संदीप मोहीते यांनी ती निलेश वाघुले यांच्याकडून विकत घेतली, तदनंतर दिपा ठोसर यांनी ती संदीप मोहीतेंकडून २०२३ साली विकत घेतली. अपिलार्थीना मुळ मालकांच्या वीज जोडणीची तारीख वीज देयकावर हवी आहे.

- अपिलार्थीने नमुद केले की, महावितरण, टाटा पॉवर सारख्या इतर वीज वितरण कंपन्या, वीज जोडणीच्या तारखा वीज देयकावर देऊन माननीय आयोगाच्या नियमावलीचे पालन करतात, परंतू, प्रतिवादी अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कंपनी वीज देयकावर सुरवातीच्या वीज जोडणीची तारीख न देऊन आयोगाच्या नियमावलीचे पालन करोत नाहीत. अदानी कंपनी वीज देयकावर वीज

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

जोडणीची तारीख का देत नाही? म्हणून अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कंपनीकडे अर्ज केला. प्रतिवादीने दिनांक ५ ऑगष्ट २०२३ चे पत्र व दिनांक २६ सप्टेंबर २०२३ चे ईमेल अन्वये वीज देयकाच्या पुढील बाजूस वीज जोडणीची तारीख नमुद केली आहे, व वीज जोडणीची तारीख ८ जून २०२३ आहे; असे कळवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला.

- अपिलार्थीने नमुद केली की, प्रतिवादी अपिलार्थीस वीज जोडणीची तारीख देऊ शकत नाहीत, मात्र महाराष्ट्र शासनाच्या वतीने पत्र आल्यास सदर माहिती देऊ शकू असे कळविले.

- अपिलार्थीने नमुद केली की, त्यांना त्यांच्या मुळ मालकांच्या वीज जोडणीची तारीख न मिळाल्याने दिनांक ११ सप्टेंबर २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने सदर तक्रार 'गाऱ्हाणे' च्या व्याख्येत बसत नसल्याने दिनांक १५ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये ती फेटाळली.

- सदर आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी दाखल केले. अपिलार्थीने त्याच्या अभिवेदनात (विद्युत पुरवठा संहीता आणि कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनिमयम, २०२१ विनियम १६.२.४. च्या तरतुदीनसार **वीज देयकावर माझ्या मुळ खोली मालकाची वीज जोडणीची तारीख देण्यात यावी,** ही विनंती केली.

- सुनावणी दरम्यान अपिलार्थीस विचारण्यात आले की, त्यांना वीज देयकावर स्वतःच्या जोडणीची तारखे ऐवजी मुळ मालकाच्या जोडणीची तारीख का हवी आह?. यावर अपिलार्थीने सांगितले की सदर जागी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण SRA मार्फत भविष्यात पुर्नविकास झाल्यास त्यांना नवीन रूम मिळण्यास फायदा राहील. सदर जागा ही संरक्षण विभागाची (Defence Department) असल्याने केंद्र शासनाच्या मालकीची जमीन आहे व त्यावर झोपडपट्टी बांधण्यात आली आहे. सध्यातरी संरक्षण विभागाचे पुर्नविकास करण्याचे काहीही नियोजन नाही, परंतू अपिलार्थीस त्याची अपेक्षा आहे.

४. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १ मार्च २०२४ रोजीच्या झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे. *(टिप्पणी : प्रतिवादी यांचे उत्तर इंग्रजीमध्ये आहे)*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थी दिपा निवृत्ती ठोसर हे खोली क्र.९४, त्रिमुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था, दत्तात्रय चाळ न. २, इंदिरानगर न.१, दत्त मंदिराजवळ, साईनाथ नगर रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ येथील घरगुती वीज ग्राहक (क्र.१५३५१९८७६) आहेत.

- श्री. संदीप मोहीते यांच्या नावाने असलेल्या ग्राहक खाते क्र.१५२२९६४१५ च्या वीज देयकावरचे नाव बदलण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाला. अर्ज व कागदपत्राच्या आधारे नवीन ग्राहक क्र.१५३५१९८७६ देऊन, वीज देयकावरील नाव बदलून दिनांक ८ जून २०२३ रोजी श्रीमती दिपा निवृत्ती ठोसर यांच्या नावे करण्यात आले. **श्रीमती दिपा निवृत्ती ठोसर हया दिनांक ८ जून २०२३ पासून प्रतिवादी यांच्या ग्राहक झाल्यामुळे, त्या जागेवरील पर्वीच्या नोंदणीकृत ग्राहकाची नाव, तारीख, व इतर तपशील देण्याच कोणतेही कारण नाही. कारण अपिलार्थी त्यावेळी प्रतिवादींचे ग्राहकच नव्हते.**

- ग्राहकाने २५ जुलै २०२३ रोजीच्या पत्रानव्ये वीज देयकावर त्यांच्या मुळ खोली मालकाला वीज जोडणी दिल्याची तारीख नमुद करून देण्यात यावी म्हणून अर्ज दाखल केला. अपिलार्थी ज्या तारखेपासून प्रतिवादींचे ग्राहक झाले अशी तारीख (दिनांक ८ जून २०२३) प्रतिवादीना दिनांक ५ ऑगष्ट २०२३ चे पत्र व दिनांक २६ सप्टेंबर २०२३ च्या ईमेल द्वारे कळविण्यात आले.

- विद्युत पुरवठा संहीता आणि कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनिमय २०२१ मधील कलम १६.२.४.(अ) खालीलप्रमाणे.

  *"१६.२.४. देयकामध्ये इतर बाबींबरोबरच खालील माहिती सुवाच्य स्वरूपात असेल*

  *(अ) ग्राहक क्रमांक, नाव आणि पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी आणि जोडणीचा दिनांक"*

प्रतिवादीने नमुद केले की, वरील तरतुदीनुसार वीज देयकावर अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणेच तपशील नमुद आहे. मात्र, सध्याच्या ग्राहकाशी संबधीत नसलेल्या वीज जोडणीचा माहितीचा आग्रह अपिलार्थी करत आह, तो आयोगाच्या विनियम १६.२.४. नुसार अयोग्य आहे. अपिलार्थीस अन्य ग्राहकांच्या वीज जोडणीचा माहिती मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही, तसेच,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

प्रतिवादीतर्फही अन्य ग्राहकाचा तपशील त्रयस्थ व्यक्तीस दिला जात नाही. अपिलार्थी हे पुर्वीपासून जागेचे मालक नाहीत, वा त्यांच्या नावे वीज जोडणी नाही, त्यामुळे अपिलार्थी प्रतिवादीचा ग्राहक असल्याचा दावा करू शकत नाहीत; सबब, त्यांना वीज कायदा २००३ अंतर्गत कोणतीही माहिती मिळविण्याचा अधिकार त्यांना नाही. वीज कायदा २००३ च्या कलम २(१५) अंतर्गत 'गाऱ्हाणेची' व्याख्या खालोलप्रमाणे आहे.

*'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा;*

तसेच वीज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

*"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज पुरवढा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

वरील विवेचनावरून असे सिध्द होते की, अपिलार्थी हे प्रतिवादींचे तत्कालीन ग्राहक नाहीत व त्यांनी तक्रारीत मागितलेली त्यावेळच्या ग्राहकांची माहिती मागणे गाऱ्हाणेच्या व्याख्येत बसत नाही.

- प्रतिवादीने माननीय मुंबई उच्च न्यायालय, सु-मोटो रिट याचीका क्र. २ / २०२३ (व इतर) दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ चा निर्णय संदर्भीत केला आहे. निर्णयात असे नमुद केले की अनधिकृत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

बांधकामांना वीज पुरवठा दिलेला असला तरी सुध्दा असे बांधकाम अधिकृत असल्यासाठी वीज देयक पुरावा म्हणून वापरता येत नाही.

- प्रतिवादीने माननीय आयोगाचे दिनांक २६ डिसेंबर २०२३ चे कृती मानके विनियम २०२१ बाबतचे इंग्रजी भाषेतील प्रॅक्टीस डायरेक्शन खाली उद्धृत केले आहेत ते आहेत ते खालीलप्रमाणे.

> *"Practice Direction:*
>
> *a. Distribution Licensee shall add following disclaimer in their Application format for the new electricity connection: "This application for power supply when processed and considered by the distribution licensee cannot be treated or utilised as proof that the premises for which the power supply is sought is an authorised structure nor would such consideration of an application by the distribution licensee amount to proof of ownership of premises."*
>
> *b. Distribution Licensee shall add following statement in Electricity Bill: "This bill for power supply cannot be treated or utilised as proof that the premises for which the power supply has been granted is an authorised structure nor would the issuance of the bill amount to proof of ownership of the premises."*

- आधीची रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लिमीटेड कंपनी प्रतिवादी अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड यांनी विकत घेतली. रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लिमीटेडचा पुर्वीचा मुळ रेकॉर्ड शोधन संबधीत तपशील शोधन अत्यंत अवघड व जिकरीचे आहे.

- प्रतिवादीने नमुद केले की, त्यांच्या कामाच्या गुणवत्तेत, आणि कामाच्या स्वरूपात कोणताही दोष, अपूर्णता, कमतरता किवां अपुरेपणा नाही. तसेच, माननीय विद्युत लोकपालांकडे अशाच प्रकारचे त्याच विषयाबाबतचे अभिवेदन क्रमांक ४३ / २०२३ बाबूराव खांबे विरूध्द अदाणी इलेक्ट्रिसीटी मुंबई

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

लिमिटेड हे वीज जोडणीची तारीख ही गाऱ्हाणेच्या व्याख्येच्या कक्षेत बसत नाही म्हणून फेटाळण्यात आल्याचे स्पष्ट केले.

- प्रतिवादीने विनंती केलो की, वादी प्रतिवादी यांचो कागदपत्र व संपर्ण तथ्याचा विचार करता मंचाने दिलेला आदेश कायम ठेवावा व अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. उपलब्ध माहितीवरून असे दिसते की, श्रीमती दिपा निवृत्ती ठोसर, खोली क्र.९४, त्रिमुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था, यांनी श्री. संदीप मोहीते यांच्या नावाने असलेल्या ग्राहक खाते क्र.१५२२९६४१५ च्या वीज देयकावरचे नाव बदलण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केला. प्रतिवादीने अर्ज व कागदपत्रांच्या आधारे वीज देयकावरील नाव बदलून दिले, मात्र त्यासाठी **नवीन ग्राहक क्र.१५३५१९८७६ दिनांक ८ जून २०२३ रोजी देण्यात आला**. अपिलार्थी श्रीमती दिपा निवृत्ती ठोसर हया दिनांक ८ जून २०२३ पासून प्रतिवादी यांच्या ग्राहक झाल्या. सबब, या जागेवरील पूर्वीच्या नोंदणीकृत ग्राहकांची नावे, तारीख, व इतर तपशील देण्याचे कोणतेही सबळ कारण नाही, कारण अपिलार्थी त्यावेळी प्रतिवादींचे पुर्वलक्ष प्रभावापासून ग्राहकच नव्हते. तसेच ग्राहकाने मागितलेली माहिती ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २००६ / २०२० मधील कलम २.३ नुसार 'गाऱ्हाणेच्या' व्याख्यत बसत नाही. गाऱ्हाणेची व्याख्या परिच्छेद क्रं.४ मध्ये दिली आहे.

६. विद्युत पुरवठा संहीता आणि कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनिमय २०२१ मधील कलम १६.२.४.(अ) च्या तरतुदीनुसार वीज देयकामध्ये इतर बाबींबरोबरच ग्राहक क्रमांक, नाव आणि पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी आणि जोडणीचा दिनांक इत्यादी बाबी अपिलार्थी जेव्हा ग्राहक झाले, तेव्हापासूनचा तपशील नमुद आहे, आणि अपिलार्थीस अन्य किंवा पुर्वीच्या ग्राहकांच्या वीज जोडणीचा तपशील किंवा तारीख त्यांच्या वीज देयकावर मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

७.	अपिलार्थीच्या वीज जोडणीची मुळ तारीख मिळण्याची विनंती त्यांनी आपल्या अर्जात केली आहे. सदर मागणी 'गाऱ्हाणेच्या' व्याख्यत बसत नाही.

८.	वरील सर्व बाबींचा एकत्रित उहापोह करता, मंचाचा आदेश कायम ठेवण्यात येत असून अपिलार्थींचे अभिवेदन फेटाण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai